# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No VI of 2017)

## National Service Scheme

**Dr. Shyam Khandare**
**Director**
**Mo. No. - 7020482443**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@gmail.com


पत्र क्र. **No.GU/NSS/335/2026** **Dt : 20 /02/2026**

**प्रती,**

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख / रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत गडचिरोली जिल्ह्यातील सर्व रासेयो महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:— गडचिरोली जिल्हयातील प्रस्तावित जीवनधारा— गडचिरोली जिल्हा रक्तदान अभियान या नियमित रक्तदान शिबीर प्रकल्प रासेयो महाविद्यालयात आयोजित करण्याबाबत.**

**संदर्भ :— REF. No.: SGSF/CSR/Blood/2026/10 दिनांक 06/02/2026**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, श्री गुरूदेव सेवा फाऊंडेशन, ही संस्था गडचिरोली जिल्हयात सार्वजनिक आरोग्य, रक्तदान व सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. जिल्हयातील गरीब, आदिवासी व गरजू रूग्णांना वेळेवर व मोफत रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने संस्थेच्या वतीने गडचिरोली जिल्हयातील सर्व रासेयो महाविद्यालयात महिन्यातून एक वेळ नियमित रक्तदान शिबिरे राबविण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

गडचिरोली हा दुर्गम, आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा असून केंद्र शासनाने या जिल्हयाला आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित केले आहे. जिल्हयात रक्ताची मोठया प्रमाणावर गरज असताना रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. अशा परीस्थितीत विद्यार्थी वर्गाचा सहभाग हा या प्रकल्पासाठी अत्यंत महत्वाचा व निर्णायक ठरू शकतो. सदर प्रकल्प पूर्णत: CSR निधीतून व संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने गडचिरोली जिल्हा रक्तदान अभियान या नियमित रक्तदान शिबीर प्रकल्प यशस्वी करण्यासाठी रासेयो महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभाग व्हावा या दृष्टीने रासेयो महाविद्यालयात गडचिरोली जिल्हयातील प्रस्तावित जीवनधारा— गडचिरोली जिल्हा रक्तदान अभियान या नियमित रक्तदान शिबीर प्रकल्प रासेयो महाविद्यालयात आयोजित करण्याकरिता संलग्नित पत्र श्री. गुरूदेव सेवा मंडळ यांच्याशी संपर्क साधुन सदर शिबीर यशस्वीरित्या पार पाडावे व त्याचा अहवाल रासेयो विभाग गोंडवाना विद्यापीठ यांच्याकडे सादर करावा, ही विनंती.

**डॉ. श्याम खंडारे**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**



# SHRI GURUDEV SEVA FOUNDATION

Bramhapuri Distt.Chandrapur
Reg.No: Chandrapur/0000667/2025

PRESIDENT
KRUPAL SUKHDEO MESHRAM

Near SDO Quarter,Civil Line Bramhapuri District Chandrapur –Pin Code 441206

Ref. No.: SGSF/CSR/Blood/2026/10

दिनांक : 6 / 2 / 2026

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
प्र-कुलगुरू कार्यालय
आवक क्र............ दि..........
जावक क्र. 570 दि. 18/2/2...

प्रति,
मा. कुलगुरू महोदय,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

**विषय :** गडचिरोली जिल्ह्यातील प्रस्तावित जीवनधारा – गडचिरोली जिल्हा रक्तदान अभियान या नियमित रक्तदान शिबिर प्रकल्प यशस्वी करण्यासाठी पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहभागाबाबत तसेच सर्व संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आवश्यक निर्देश देण्याबाबत नम्र विनंती.

महोदय,

सविनय निवेदन असे की, श्री गुरुदेव सेवा फाऊंडेशन, ही संस्था गडचिरोली जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य, रक्तदान व सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. जिल्ह्यातील गरीब, आदिवासी व गरजू रुग्णांना वेळेवर व मोफत रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने संस्थेच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये महिन्यातून एक वेळ नियमित रक्तदान शिबिरे राबविण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

आपणास विदित आहेच की गडचिरोली हा दुर्गम, आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा असून केंद्र शासनाने या जिल्ह्याला "आकांक्षित जिल्हा" म्हणून घोषित केले आहे. जिल्ह्यात रक्ताची मोठ्या प्रमाणावर गरज असताना रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थी वर्गाचा सहभाग हा या प्रकल्पासाठी अत्यंत महत्त्वाचा व निर्णायक ठरू शकतो.गडचिरोली जिल्ह्यात एकही खाजगी रक्तपेढी अस्तित्वात नाही. संपूर्ण जिल्ह्यासाठी केवळ जिल्हा सामान्य रुग्णालयातील शासकीय रक्तपेढीच कार्यरत असून याच रक्तपेढीतून जिल्ह्यातील सर्व तालुका रुग्णालयांना रक्तपुरवठा करण्यात येतो. संस्थेतर्फे ठाम व स्पष्ट हमी देण्यात येत आहे की,

☞ रक्तदान शिबिरांमधून संकलित होणारे संपूर्ण रक्त फक्त व फक्त शासकीय रक्तपेढीसच देण्यात येईल.
☞ कोणत्याही खाजगी रक्तपेढीस किंवा खाजगी संस्थेस रक्त दिले जाणार नाही.

महोदय, गडचिरोली जिल्ह्यातील पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. जर या विद्यार्थ्यांचा रक्तदान शिबिरांमध्ये सक्रिय सहभाग वाढला, तर हा प्रकल्प निश्चितच यशस्वी होईल. तसेच विद्यार्थ्यांमध्ये:

- देशभक्तीची भावना जागृत होईल

18/02/2026

9545310591, krupalsm@gmail.com



Bramhapuri Distt.Chandrapur
Reg.No: Chandrapur/0000667/2025 KRUPAL SUKHDEO MESHRAM

Near SDO Quarter,Civil Line Bramhapuri District Chandrapur –Pin Code 441206

- अंधश्रद्धा व रक्तदानाविषयीचे गैरसमज दूर होतील
- सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होईल
- कर्तव्यदक्ष व संवेदनशील नागरिक घडतील

म्हणूनच आपण आपल्या स्तरावरून गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत असलेल्या सर्व पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांच्या प्राचार्यांना लेखी निर्देश देऊन विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तपणे रक्तदान करावे तसेच संस्थेच्या रक्तदान शिबिरांना आवश्यक सहकार्य करावे. असे आदेश द्यावेत, ही नम्र विनंती आहे.

तसेच या संदर्भात संस्थेला एक अधिकृत सहकार्य / आश्वासन पत्र दिल्यास, संस्थेचे कर्मचारी व स्वयंसेवक सर्व महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष जाऊन रक्तदानाविषयी जनजागृती करतील, प्रबोधनात्मक सत्रे घेतील व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवतील. यामुळे हा प्रकल्प अधिक नियोजित व प्रभावीपणे राबविता येईल.

महत्वाची बाब म्हणजे, या प्रकल्पाकरिता कोणत्याही महाविद्यालयाला किंवा विद्यापीठाला कोणताही आर्थिक खर्च करावा लागणार नाही. सदर प्रकल्प पूर्णतः CSR निधीतून व संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

महोदय, हा प्रकल्प केवळ रक्तदानापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, मानवता व राष्ट्रसेवेची भावना रुजविणारा उपक्रम आहे. विद्यापीठ प्रशासनाचे सहकार्य लाभल्यास हा उपक्रम गडचिरोली जिल्ह्यासाठी आदर्श ठरेल, असा आम्हाला दृढ विश्वास आहे.

आपल्या सकारात्मक निर्णयाची व सहकार्याची कळकळीने अपेक्षा आहे.

आपला विश्वासू,

अध्यक्ष
श्री गुरुदेव सेवा फाउंडेशन ब्रह्मपुरी
तह. ब्रह्मपुरी जिल्हा चंद्रपूर

9545310591, krupalsm@gmail.com

जा.क्र/सारुगड/शिबिरे/परवानगी/1303/2026
कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक गडचिरोली

16 FEB 2026

प्रति,
अध्यक्ष
श्री. गुरुदेव सेवा फाउंडेशन,
ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर

**विषयः-** जिवनधारा- गडचिरोली जिल्हा रक्तदान अभियान या प्रकल्पास प्रस्तावालील जबाबदीच्या विभागानुसार मान्यता देण्याबाबत.

**संदर्भः-** १) श्री.गुरुदेव सेवा फाउंडेशन,ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर यांचे पत्र क्र/ SGFS/jeevandhara/2026/02,दि.०६/०२/२०२६.
२)विशेष कार्य अधिकारी उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय मुंबई पत्र क.उप मु.वै.स. क/२०२५-२६/०१२३. दि. १२/०१/२०२६ प्राप्त दि.०६/०२/२०२६

गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयातील शासकिय रक्तपेढीस अंदाजे ११,००० ते १२,००० रक्तपिशव्यांची आवश्यकता भासते. उपलब्ध रक्तसंकलन अपुरे असल्यामुळे काही प्रमाणात रक्तपिशव्या जिल्हयाबाहेरील खाजगी रक्तपेढयांकडुर खरेदी कराव्या लागतात.

जिल्हयातील रक्तटंचाई कमी करण्यासाठी श्री.गुरुदेव सेवा फाउंडेशन यांच्यामार्फत जिवनधारा-गडचिरोली जिल्हा रक्तदान अभियान हा प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
प्रस्तावाचा विचार करुन खालील अटी व जबाबदारीच्या विभागणीप्रमाणे सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

## जिल्हा सामान्य रुग्णालय/रक्तपेढी, गडचिरोली यांची जबाबदारी

- रक्त संकलन अधिकारी, रक्तकेंद्र तंत्रज्ञ, परिचारकव सहाय्यक कर्मचारी नियुक्ती
- रक्तदात्यांची वैद्यकिय पात्रता निश्चिती
- रक्तसंकलन, तपासणी, साठवन व वितरन
- रक्तगट व संसर्गजन्य आजार तपासण्या

- स्थानिक रुग्णालयात रक्तदान कक्ष उपलब्ध करणे
- रक्तसंकलनाशी संबंधित संपूर्ण वैद्यकीय जबाबदारी
- Drugs & Cosmetics Act, 1940 व NBTC नियमांचे काटेकोर पालन

वरील सर्व जबाबदाऱ्या जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येतील.

## श्री गुरुदेव सेवा फाऊंडेशन यांची जबाबदारी

- शिबिर व्यवस्थापन व स्थळ व्यवस्था
- नोंदणी व रक्तदाता समन्वय
- जनजागृती व प्रचार
- स्वयंसेवक व्यवस्थापन (वैद्यकीय कामात हस्तक्षेप नाही)
- अहवाल, दस्तऐवजीकरण व CSR लेखांकन
- रक्तदात्यांसाठी अल्पोपहार व प्रमाणपत्र वितरण

संस्था कोणत्याही वैद्यकीय निर्णय, तपासणी, रक्तसंकलन, साठवण किंवा वितरण प्रक्रियेत हस्तक्षेप करणार नाही. सर्व वैद्यकीय जबाबदारी शासकीय रक्तपेढी व जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाची राहील.

सदर प्रकल्पांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या प्रत्येक रक्तदान शिबिराची **तारीख, वेळ व ठिकाण** याबाबतचा अंतिम निर्णय हा CSR निधी प्राप्त झाल्यानंतर घेण्यात येईल.

हा निर्णय खालील घटकांमध्ये परस्पर चर्चा व समन्वय साधून निश्चित करण्यात येईल :

- जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, शासकीय रक्तपेढी, जिल्हा आरोग्य विभाग प्रशासन
- संबंधित तालुका प्रशासन, श्री गुरुदेव सेवा फाऊंडेशन
  सर्व संबंधित विभागांचा समन्वय व नियोजनानंतरच शिबिरे आयोजित करण्यात येतील.

प्रकल्पाची पारदर्शक, गुणवत्तापूर्ण व परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असल्यास सुस्पष्ट निरीक्षण व मूल्यमापन (Monitoring & Evaluation) अहवाल तयार करण्यात येईल सदर अहवाल आवश्यकतेनुसार CSR निधी प्रदान करणाऱ्या कंपनीस सादर करण्यात येईल. सदर प्रकल्प पूर्णतः CSR निधी व संस्थेमार्फत राबविण्यात येणार असून शासनावर कोणताही थेट अथवा अप्रत्यक्ष आर्थिक बोजा येणार नाही.

वरील अटींच्या अधीन राहून गडचिरोली जिल्ह्यात नियोजनानुसार रक्तदान शिबिरे आयोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

डॉ.वर्षा एस.लहाडे
जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय गडचिरोली,